**<u>नियमित दिवाणी दावा नं. १०३१/२०१३ मधील आदेश नि. क्र. २३</u>**

(CNR NO. MHSO–1300–1709–2013)

वादी यांनी प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६, नियम ९ प्रमाणे दावा मिळकती संदर्भात न्यायालयीन आयुक्त नेमणुकीबाबत दाखल केला आहे.

२. वादीने दाखल केलेल्या अर्जावर प्रतिवादींनी म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे सदर अर्ज त्यांचेविरुध्द विना म्हणणे पुढे चालविण्यात आला.

३. दोन्ही बाजुंचे विधीज्ञ युक्तीवादाकरीता गैरहजर असल्याने त्यांचे विरुद्ध युक्तीवाद नाही असा आदेश पारित करण्यात आला. तद्नंतर दोन्ही पक्षकार वारंवार गैरहजर आहेत.

४. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले. दाव्याचे व अर्जाचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींनी वाद मिळकतीतील त्यांचे शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये म्हणून निरंतर ताकिदीकरिता तसेच प्रतिवादीनी बोळ जागेत अतिक्रमण केलेस ते पाडून मिळणेसाठी आज्ञार्थी ताकिदीचा व विकल्पेकरुन अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळणेकरिता दाखल केला आहे.

५. वादीने न्यायालयीन आयुक्त यांनी मौजे गौडगाव, ता. बार्शी येथील सि.स. नं.३२८, क्षेत्रफळ २०.९ चौ.मी. ही वादीच्या खाजगी बोळाची जागा (भावकी रस्ता) ची पाहणी करावी, वादीचे दावा कलम १(ड) मध्ये नमूद केलेले सि.स.नं.३२८ मधील पुर्व बाजूकडून प्रतिवादीने भिंत बांधून अंदाजे एक ते दिड फुट अतिक्रमण केले आहे त्याची पाहणी करुन अहवालात त्याबाबत नमूद करावे. दावा मिळकतीची मोजणी झाल्यानंतर लगत क्षेत्रधारक, वादी, प्रतिवादी यांचेसमक्ष दावा मिळकतीच्या हद्दीखुणा निश्चित करुन तसे दगड लावावेत व कमिशन अहवाल नकाशासह दाखल करावा अशी विनंती केली आहे.

६. प्रस्तुत प्रकरणातील वादपत्रांचे अवलोकन केले. वादीचे कथनाप्रमाणे

प्रतिवादींनी वादीचे खाजगी बोळामध्ये अतिक्रमण करुन बांधकाम केले आहे, याउलट प्रतिवादींचे कथन असे की, त्यांनी त्यांचे मालकीचे मिळकतीमध्ये बांधकाम केले आहे. उभय पक्षाची वाद कथने ध्यानात घेता, त्यांचेमध्ये मिळकतींमधील अतिक्रमणाबाबत वाद आहे असे दिसून येते. त्यामुळे सदर वाद संपुष्टात आणणेकरीता स्थानिक तपासणी आवश्यक आहे. उभय पक्षातील वाद व वादीचे अर्जातील कथने ध्यानात घेता सदर प्रकरणामध्ये न्यायालयीन आयुक्तामार्फत चौकशी करणे आवश्यक आहे. प्रतिवादींनी सदर अर्जास कोणतीही हरकत नोंदवली नाही. अशा परिस्थितीत, सदर अर्ज मंजूर केल्याने प्रतिवादींना कोणताही बाध निर्माण होणार नाही.

७. सदर अर्जाचे स्वरुप, दाव्याचे स्वरुप व वादी मागणी करीत असलेला अनुतोष ध्यान्यात घेता, प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास स्थानिक तपासणी होवून अतिक्रमण आहे किंवा कसे याबाबत स्पष्टता येणार आहे. त्यामुळे उभय पक्षातील वाद संपुष्टात येणार आहे. वादीने मागितलेली मागणी पाहता सदर मागणी न्यायाच्या दृष्टीने मंजूर करणे महत्वाचे आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश २६, नियम ९ प्रमाणे न्यायालय वादातील बाब स्पष्ट करण्याकरीता स्थानीक तपासणी करीता कोर्ट कमिशनरची नेमणूक करु शकते. सदर प्रकरणामध्ये उभय पक्षातील वाद ध्यानात घेता सदर वाद निर्णायक करण्याकरीता स्थानीक तपासणी आवश्यक असून त्याबाबत अहवाल हा अभिलेखावर येणे गरजेचे आहे. सदर अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे काहीही नुकसान होणार नाही. सदर अर्ज मंजूर केल्यास दाव्याचे कामकाज गुणावगुणावर चालून निकाल देण्यास मदत होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे उचित होईल. सबब उपरोक्त सर्व कारणमिमांसा ध्यानात घेता सदर अर्ज मंजूर करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य व आवश्यक वाटते. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

## आदेश

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. बार्शी न्यायालयातील विधीज्ञ यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करण्यात येते.

३. वादी व प्रतिवादी यांनी संमतीने कोर्ट कमिशनर म्हणून कामकाज

करण्याकरीता विधीज्ञांचे नाव पुढील सुनावणीपर्यत सादर करावे, अन्यथा पुढील आदेश पारीत केला जाईल.

४. कोर्ट कमिशनर यांनी मौजे गौडगाव, ता. बार्शी येथील सि.स. नं.३२८, क्षेत्रफळ २०.९ चौ.मी. मधील बोळाच्या जागेची (भावकी रस्ता) ची पाहणी करावी, वादीचे दावा कलम १(ड) मध्ये नमूद केलेले सि.स.नं.३२८ मधील पुर्व बाजूकडून प्रतिवादीने भिंत बांधून अंदाजे एक ते दिड फुट अतिक्रमण केले आहे त्याची पाहणी करुन अहवालात त्याबाबत नमूद करावे. दावा मिळकतीची मोजणी झाल्यानंतर लगत क्षेत्रधारक, वादी प्रतिवादी यांचेसमक्ष दावा मिळकतीच्या हद्दीखुणा निश्चित करुन तसे दगड लावावेत व कमिशन अहवाल नकाशासह दाखल करावा.

५. मोजणीअंती सदर मिळकतीपैकी कोणीही कोणाकडे अतिक्रमण केले असल्यास त्याबाबत टिपण व खुलासा नकाशात स्पष्टपणे नमूद करावा. तसेच कोर्ट कमिशनर यांनी या दाव्याचे अनुषंगाने आवश्यक निरिक्षण आढळुन आल्यास अहवालामध्ये नमुद करावे.

६. वादी यांनी कोर्ट कमिशनची फी भरावी.

७. संबंधितांनी आदेशाची पूर्तता करावी.

HARSHADA UMATAI UTTAM PATIL

Digitally signed by HARSHADA UMATAI UTTAM PATIL
Date: 2025.10.04 17:42:51 +0530

( श्रीमती एच. यु. यु. पाटील )

दिनांक ०३/१०/२०२५. तिसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, बार्शी.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | A. A. Chavan. |
| (b) | Court | : | Smt. H. U. U. Patil,<br>3rd Jt. Civil Judge, J. D.&<br>J. M. F .C. Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 03/10/2025. |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 04/10/2025. |